वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय

पहा :- १) दिवाणी नियमावली पुस्तिका प्रकरण ३६ मधील परिच्छेद ७०१.
२) मा. उच्च न्यायालय, मुंबई पत्र क्र.एक्स (जन)-०२०२/३४९/२०१४, दिनांक ९ एप्रिल, २०१४.
३) उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन परिपत्रक क. विसानि-२०२४/प्र.क.९७/उद्योग-६, दिनांक २४/१०/२०२४

आदेश क्र. ३९१ /२०२४ **दिनांक :- ११ /११/२०२४.**

दिवाणी नियम पुस्तिका (Civil Manual) १९८६ भाग-१ मधील प्रकरण ३६, परिच्छेद ७०१ नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम हे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेत.

वाशिम जिल्ह्यामधील सर्व विधानसभा मतदारसंघात **बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२४** रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने वाशिम मुख्यालय व वाशिम न्यायीक जिल्ह्यातील सर्व अपिलीय, दिवाणी व फौजदारी न्यायालये व त्यांची कार्यालये यांना **बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२४** रोजी स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात येत आहे.

सबब, **बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२४** रोजी वाशिम मुख्यालय व वाशिम न्यायीक जिल्ह्यातील सर्व तालुक्याच्या ठिकाणच्या अपिलीय, दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे व त्यांच्या कार्यालयाचे कामकाज बंद राहील.

तसेच, घोषित केलेल्या सुट्टीच्या परिणामस्वरूपी, वाशिम जिल्हा न्यायिक विभागातील न्यायालयांची किमान २३७ दिवाणी कार्यदिनांची मर्यादा कायम राखली जाण्याच्या दृष्टीने पुढे असेही निर्देशीत करण्यात येते की, वाशिम जिल्हा न्यायीक विभागातील सर्व न्यायालये व त्यांची कार्यालये हे **शनिवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२४** रोजी चालू राहतील.

वरील आदेशाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(एस. व्ही. हांडे),
प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वाशिम.

प्रत :- माहितीकरीता

१) मा. प्रबंधक (निरीक्षण), उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
२) मा. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ, नागपूर.

(एस. व्ही. हांडे),
प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वाशिम.